www.esakal.com
सकाळ
सकाळ Today
गुरुवार,
६ सप्टेंबर २०१८ | ४ सातारा

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# विद्यार्थ्यांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करा : डॉ. पाटील

## कोरेगावात भौतिकशास्त्र विषय प्रशिक्षण कार्यशाळा

**कोरेगाव, ता. ५ :** ''विद्यापीठ अभ्यास मंडळाने तयार केलेल्या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे. नोकरीच्या मागे न लागता नोकरी द्यायला शिकावे,'' असे आवाहन डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात आयोजित भौतिकशास्त्र विषयाच्या प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत होते. डॉ. पाटील म्हणाले, ''शासनाच्या बदलत्या ध्येय, धोरणानुसार विद्यार्थी केंद्रस्थानी ठेवून विद्यापीठ अभ्यास मंडळाने अभ्यासक्रम तयार केला आहे. विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानाची ओळख, भविष्यात रोजगार व नोकरीची संधी उपलब्ध व्हावी, हा त्यामागचा उद्देश आहे. विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती निर्माण होण्याच्या दृष्टीने अध्यापन झाले पाहिजे. विद्यार्थ्यांमधील क्रयशक्तीचा उपयोग नवीन शोध लावण्यासाठी झाला पाहिजे. कार्यशाळेस तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉ. एल. डी. कदम, डॉ. एन. एस. शिंदे, डॉ. एस. एम. कदम उपस्थित होते. डॉ. विनायक जमदाडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विद्या नावडकर व प्रा. संगीता वीरकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बी. एस. लोकडे यांनी आभार मानले.